19 AUG 2022 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# देणगीमधून साकारणार संशोधक विद्यार्थीनींचे वसतिगृह

## मारूलकर कुटुंबाचे दातृत्व : मुलीच्या स्मरणार्थ शिवाजी विद्यापीठाला दिला ३५ लाखाचा निधी

प्रतिनिधी
कोल्हापूर

अत्यंत सुदृढावस्थेत जन्मलेली बालिका अचानक ताप आल्याने वयाच्या तिसऱ्या-चौथ्या वर्षी विकलांग, इंद्रियशिथिल बनते. आई-बापाचा तिला पूर्ववत करण्याचा संघर्ष सुरू होतो. एक दिवस हे मूल आता बरे होऊ शकणार नाही, ही वस्तुस्थिती समोर आली. रजनी व पंडीत मारूलकर या दांपत्याच्या या मुलीने वयाच्या ४५ व्या वर्षी ती मुलगी अखेरचा श्वास घेतला. आपल्या माघारी तिच्या आयुष्याची तरतूद म्हणून मारूलकर दांपत्याने ३५ लाख रुपयांची बचत केली होती. आता ही ३५ लाख रुपयांची रक्कम तिच्या स्मरणार्थ शिवाजी विद्यापीठाला त्यांनी प्रदान केली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्याकडे धनादेश सुपुर्द केला. या निधीमधून विद्यापीठाच्या संशोधक विद्यार्थिनींसाठी वसतीगृह साकारले जाणार आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाकडे आपली मुलगी अस्मिताच्या स्मृतीप्रित्यर्थ ३५ लाखाचा धनादेश कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे सुपुर्द करताना पंडीत मारूलकर व रजनी मारूलकर दांपत्य आदी.

मारूलकर हे १९६८ ते १९९९ या कालावधीमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या सेवेत होते. सहाय्यक कुलसचिव पदावरून ते सेवानिवृत्त झाले. त्यांची कन्या अस्मिता तीन वर्षांची असताना तापाचे निमित्त होऊन अंथरूणाला खिळली. तिच्या शरीराचे नियंत्रण करणारे मेंदूतील केंद्र निकामी झाले. केवळ दृष्टी, श्रवण आणि बुद्धीमत्ता एवढेच कायम राहिले. १९ डिसेंबर २०२० रोजी वयाच्या ४५व्या वर्षी तिने या जगाचा निरोप घेतला. आपल्या माघारी तिची हेळसांड होऊ नये, यासाठी या दांपत्याने पै न पै साठवून ३५ लाख रुपयांची बचत केली. हे पैसे विद्यापीठाला देणगी स्वरूपात देवून एक वेगळा आदर्श निर्माण केला. मारुलकर म्हणाले, हा निधी अस्मिताचा आहे. तो केवळ तिच्या वतीने आम्ही विद्यापीठास सुपूर्द करीत आहोत. त्याचा विद्यापीठाने योग्य कारणास्तव विनियोग करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव उपस्थित होते.



### संशोधक विद्यार्थीनींसाठी वसतिगृह उभारणार

मारुलकर कुटुंबियांनी ज्या भावनेतून हा निधी विद्यापीठास प्रदान केला, तिचा आदर राखून विद्यापीठातील संशोधक विद्यार्थिनींसाठी प्रस्तावित असलेल्या वसतीगृहाच्या बांधकामासाठी या निधीचा विनियोग केला जाईल. त्याचप्रमाणे वसतीगृहाच्या प्रथम मजल्यावर 'सौ रजनी पंडीत मारूलकर आणि पंडीत मारूलकर यांनी कन्या अस्मिता हिच्या स्मृतीप्रित्यर्थ दिलेल्या देणगीतून या मजल्याचे बांधकाम झाले' अशी कोनशिला दर्शनी भागात बसविण्यात येईल, असेही सांगितले. मारुलकर दांपत्याने या देणगीद्वारे दातृत्वाचे एक महान उदाहरण जगासमोर ठेवले आहे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के (शिवाजी विद्यापीठ)

19 AUG 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्रीडा संचालकपदी बनसोडे; 'मानव्य'चे अधिष्ठाता देशमुख

## विद्यापीठात घोषणा; कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे प्रदान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १८ : शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालकपदी डॉ. शरद बनसोडे, तर मानव्यशास्त्र विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी डॉ. एम. एस. देशमुख यांची निवड आज घोषित केली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या उपस्थितीत दोघांना नियुक्तीपत्रे दिली.



डॉ. बनसोडे देशभक्त रत्नाप्पा कुंभार महाविद्यालयात क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक आहेत. त्यांनी बास्केटबॉलमध्ये राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीयस्तरावर उत्तम कामगिरी बजावली आहे. ते सेट परीक्षा उत्तीर्ण असून, पीएच. डी. मिळवली आहे. आंतरराष्ट्रीय बास्केटबॉल फेडरेशनचे ते पंधरा वर्षे इंटरनॅशनल इलाईट रेफ्री आहेत. बास्केटबॉल, फुटबॉल व हँडबॉल खेळांत दहा वर्षे त्यांनी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले आहे. एकाच वर्षात तिन्ही खेळांत सहभागी होण्याचा विक्रमही त्यांनी नोंदविला आहे. त्यांनी सुमारे ७५ राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धांत सहभाग नोंदविला आहे. त्यांनी २२ राष्ट्रीय कार्यशाळा, चर्चासत्रे, परिषदांतून सहभाग घेतला आहे, तर १६ परिषदांत विषय तज्ज्ञ म्हणून सहभाग घेतला आहे.



डॉ. बनसोडे



डॉ. देशमुख

> **विद्यापीठस्तरावर काम करण्याची संधी मिळत आहे. ज्या विद्यापीठाचा खेळाडू म्हणून प्रतिनिधित्व केले, तेथे अधिकारी पदावर काम करायला मिळत आहे, ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे.**
> **- डॉ. शरद बनसोडे**

> **शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशात शाखेचा अधिष्ठाता म्हणून काम करण्याची संधी मिळत असल्याबद्दल मी कुलगुरू व प्रशासनाचा आभारी आहे. मानव्य विद्याशाखेच्या गुणवत्तेत वाढ करण्यासाठी सर्व घटकांना सोबत घेऊन प्रयत्न केला जाईल.**
> **- डॉ. एम. एस. देशमुख**

डॉ. देशमुख सध्या विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक तसेच इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड लिंकेजेस कक्षाचे प्रभारी संचालक म्हणूनही कार्यरत आहेत. विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विषयाच्या अभ्यास मंडळासह अधिसभेवर त्यांनी काम केले आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकांतून त्यांचे ५३ शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहा संशोधकांनी पीएच.डी. तर एकाने एम.फील. केली आहे. पाच संशोधन प्रकल्पांवर त्यांनी काम केले आहे. सुमारे ८६ लाख रुपयांच्या कन्सल्टन्सी प्रकल्पावर त्यांनी काम केले आहे. अर्थशास्त्र संघटनेचा डॉ. धनंजयराव गाडगीळ पुरस्कार, नवी दिल्ली येथील शैक्षणिक संघटनेकडून राधाकृष्ण सुवर्णपदक पुरस्कारासह ते अनेक पुरस्कारांचे मानकरी आहेत.

पुढारी

# विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र अधिष्ठातापदी डॉ. देशमुख

## क्रीडा संचालकपदी डॉ. बनसोडे यांची निवड



डॉ. देशमुख डॉ. बनसोडे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र विद्या शाखेच्या अधिष्ठातापदी डॉ. एम. एस. देशमुख यांची आणि क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालकपदी डॉ. शरद बनसोडे यांची निवड गुरुवारी घोषित करण्यात आली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते दोघांना नियुक्तीपत्रे देण्यात आली. या पदासाठी गेल्या आठवड्यात मुलाखती घेण्यात आल्या होत्या.

डॉ. महादेव श्रीरंग तथा एम.एस. देशमुख सध्या विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक तसेच इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेस कक्षाचे प्रभारी संचालक आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकांतून त्यांचे ५३ शोधनिबंध प्रकाशित झालेले आहेत. २१ पुस्तकांचे ते लेखक आहेत. गेली २५ वर्षे ते अध्यापन व संशोधनाच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. अनेक पुरस्कारांचे ते मानकरी आहेत.

डॉ. शरद बनसोडे २० वर्षांहून अधिक काळ देशभक्त रत्नाप्पा कुंभार महाविद्यालयात क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक आहेत. आंतरराष्ट्रीय बास्केट बॉल फेडरेशनचे ते गेली १५ वर्षे इंटरनॅशनल इलाईट रेफ्री आहेत. बास्केट बॉल, फुटबॉल आणि हँडबॉल या तिन्ही खेळांमध्ये १० वर्षे त्यांनी शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले असून सुमारे ७५ राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बास्केट बॉल स्पर्धांत सहभाग नोंदविला आहे. आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकांतून त्यांचे १८ शोधनिबंध प्रकाशित आहेत. संघ निवड समिती सदस्य, प्रशिक्षक आणि व्यवस्थापक म्हणूनही काम पाहिले आहे.

लोकमत

# विद्यापीठाचे नवे क्रीडा संचालक शरद बनसोडे

## मानव्यशास्त्र अधिष्ठातापदी एम. एस. देशमुख

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालकपदी डॉ. शरद बनसोडे आणि मानव्यशास्त्र विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी डॉ. महादेव श्रीरंग तथा एम. एस. देशमुख यांची निवड गुरुवारी जाहीर करण्यात आली. त्यांना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी नियुक्तिपत्रे प्रदान केली. दोन्ही पदांसाठी गेल्या आठवड्यात मुलाखती घेण्यात आल्या. क्रीडा संचालकपद गेल्या सहा, तर अधिष्ठातापद दोन वर्षांपासून प्रभारी होते.

या नियुक्तिपत्र प्रदान कार्यक्रमास प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. भारती पाटील, पी. डी. राऊत, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, अभिजीत रेडेकर, सुनीता यादव, आदी उपस्थित होते. क्रीडा संचालक डॉ. बनसोडे हे गेल्या २० वर्षांपासून डीआरके कॉमर्स कॉलेजमध्ये क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालकपदी कार्यरत आहेत. आंतरराष्ट्रीय बास्केटबॉल फेडरेशनचे ते गेली १५ वर्षे इंटरनॅशनल इलाईट रेफ्री आहेत. मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. देशमुख हे सध्या विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालकपदी कार्यरत आहेत. विद्यापीठ आणि शासनाच्या विविध समित्यांवर त्यांनी सदस्य म्हणून काम पाहिले. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकांतून त्यांचे ५३ शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. २१ पुस्तकांचे ते लेखक आहेत. पाच संशोधन प्रकल्पांवर त्यांनी काम केले आहे.



शरद बनसोडे     एम. एस. देशमुख

19 AUG 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अधिष्ठातापदी डॉ. एम. एस. देशमुख

## डॉ. शरद बनसोडे नवे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी डॉ. एम. एस. देशमुख यांची आणि क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालकपदी डॉ. शरद बनसोडे यांची निवड गुरुवारी घोषित करण्यात आली. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते आज या दोघांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली.

शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र विद्याशाखेच्या अधिष्ठाता पदासाठी तसेच क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक पदासाठी गेल्या आठवड्यात मुलाखती घेण्यात आल्या. आज त्यांची निवड घोषित करण्यात येऊन नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनीही त्यांचे अभिनंदन केले.

याप्रसंगी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. भारती पाटील, डॉ. पी. डी. राऊत, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, संगणक विभागाचे प्रभारी संचालक अभिजित रेडेकर, सहायक कुलसचिव सुनीता यादव आदी उपस्थित होते.

मानव्यशास्त्र विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी नियुक्त करण्यात आलेले डॉ. महादेव श्रीरंग तथा एम. एस. देशमुख हे सध्या विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक तसेच इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड लिंकेजेस कक्षाचे प्रभारी संचालक म्हणूनही कार्यरत आहेत. विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विषयाच्या अभ्यास मंडळासह अधिसभेवरदेखील त्यांनी कार्य केले आहे.

विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे नूतन संचालक डॉ. शरद बनसोडे हे वीस वर्षांहून अधिक काळ देशभक्त रत्नाप्पा कुंभार महाविद्यालयात क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी क्रीडा क्षेत्रात विशेषतः बास्केटबॉलमध्ये राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्तुंग कामगिरी बजावली आहे.

लोकमत

# गुणपत्रकात चुका असणाऱ्यांनी अर्ज करावेत

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : ज्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रकामध्ये त्रुटी असतील अशा विद्यार्थ्यांनी त्यांच्या महाविद्यालयाशी संपर्क साधावा. त्याबाबतचे आपले अर्ज महाविद्यालयामार्फत शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागामध्ये तत्काळ पूरक माहितीसह सादर करावेत. निकालातील त्रुटींच्या निराकरणाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

लवकरच सर्व त्रुटींमध्ये निराकरण करून या विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे सुधारित निकाल जाहीर केले जाणार आहेत. सर्व ओएमआर शिटसच्या स्कॅनिंगचे काम विद्यापीठात सुरळीत आणि बिनचूकपणे सुरू आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

पुढारी

# विद्यापीठात आज आर्किटेक्ट बेरी जन्मशताब्दीनिमित्त परिसंवाद

**कोल्हापूर :** प्रसिद्ध आर्किटेक्ट व इंजिनिअर आर. एस. बेरी यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्टस्, कोल्हापूर सेंटर या संस्थेच्या वतीने दि. १९ ऑगस्ट रोजी 'भाषा भवन शिवाजी विद्यापीठ' येथे परिसंवादाचे आयोजन केले आहे. दि. २० रोजी या महोत्सवाची सांगता होणार आहे.

या परिसंवादासाठी बांगलादेश येथील आर्किटेक्ट मरिना तबसुम, दिल्लीचे आर्किटेक्ट चरणजीत शहा, आर्किटेक्ट अंकुर चोकशी, केरळ येथील आर्किटेक्ट टोनी जोसेफ व पुणे धनंजय डाके उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के हे भूषवणार आहेत. कार्यक्रमाची सांगता दि. २० ऑगस्ट रोजी 'भाषा भवन शिवाजी विद्यापीठ' येथे ४.०० वाजता होणार आहे.

19 AUG 2022 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांच्या चुकांमुळे काही निकालामध्ये त्रुटी

## सुधारित निकाल लवकरच; परीक्षा विभागाचा खुलासा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांनी केलेल्या चुकांमुळे त्यांच्या निकालामध्ये त्रुटी निर्माण झाल्या आहेत. निकालातील त्रुटींच्या निराकरणाचे कामकाज विद्यापीठामध्ये युद्धपातळीवर सुरू आहे. लवकरच सर्व त्रुटींचे निराकरण करून संबंधित विद्यार्थ्यांचे परीक्षांचे सुधारित निकाल जाहीर करण्यात येणार असल्याचा खुलासा शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केला.

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल २०२२ उन्हाळी सत्राच्या परीक्षांअंतर्गत १२ ऑगस्टच्या बी.एस्सी. अंतिम सत्राच्या परीक्षांच्या निकालात विद्यार्थ्यांकडून चुका झाल्याचे निदर्शनास आले. यात ओएमआर शिटमधील विषयाचा सांकेतिक क्रमांक न लिहिणे, विद्यार्थ्यांचा बैठक क्रमांक व पीआरएन क्रमांक न लिहिणे, ओएमआर शिटमधील संबंधित वर्तुळ भरताना चुकीची वर्तुळे भरणे अथवा वर्तुळे न भरणे आदी चुकांचा समावेश आहे.



शिवाजी विद्यापीठातून...

वास्तविक, या प्रकारच्या परीक्षांसंदर्भात सर्व आवश्यक त्या सूचना नमुना उत्तरपत्रिकेसह (ओएमआर शिट) सर्व महाविद्यालयांत परीक्षेपूर्वीच देण्यात आल्या होत्या. त्यानुसार सर्व माहिती विद्यार्थ्यांनी ओएमआर शिटमध्ये बिनचूकपणे नोंदविण्याची दक्षता घेणे आवश्यक होते. ज्या विद्यार्थ्यांनी माहिती अचूक भरली आहे अशा विद्यार्थ्यांचे निकाल अचूक जाहीर करण्यात आले आहेत. ज्या विद्यार्थ्यांच्या निकालामध्ये शून्य अथवा परीक्षेस अनुपस्थित असा शेरा आला आहे. त्यांनी आपापल्या महाविद्यालयाशी संपर्क साधून त्याबाबतचे आपले अर्ज महाविद्यालयामार्फत विद्यापीठाच्या परीक्षा विभागामध्ये तत्काळ सादर करावेत, असे आवाहन डॉ. जाधव यांनी केले आहे.